तात्काळ/महत्वाचे

कालमर्यादा

जा.क.शिउसं/प्राथ-२०२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०१८-१९/ ४५०८

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचे कार्यालय

दिनांक:- 20 JUN 2019

प्रति

अध्यक्ष/सचिव,

औदयोगिक तंत्रशिक्षण संस्था चिंचवड, ता. हवेली, जि. पुणे

विषय - सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे,तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेसाठी परवानगी (इरादापत्र) देण्याबाबत....

संदर्भ :-१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १,६ व २४) २०१२.

२. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र नाहप्र-२००९/(६६३/०९)/माशि-१ दिनांक २०. जुन २०१२.

३. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र एसएफएस-१०१९/प्र.क्र.१४०/एसएम-२ दिनांक २७.०१.२०१९

वरील विषयी आपणांस कळविण्यात येते की,आपल्या संस्थेने वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता प्रस्ताव सादर केला होता.त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्रमांक-०३ च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता खालील अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे.

| शासन यादी अ.क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता. | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/दर्जावाढ व मंडळ संलग्नता | मान्यता वर्ग/इयत्ता | मान्यतावर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | पुणे | औदयोगिक तंत्रशिक्षण संस्था चिंचवड, ता. हवेली, जि. पुणे | सिटी प्राईड स्कुल, रावेत, जि. पुणे | इंग्रजी | नवीन शाळा (सी बी एस ई.) (स्वयंअर्थसहाय्यित शाळा) | प्राथमिक ते उच्च माध्यमिक (इयत्ता १ ली ते इयत्ता १२ वी) सर्व शाखा | २०१९-२० |

**अटी व शर्ती :-**

१. शासन निर्णयातील अट क्र. १ नुसार सदर संस्थेने रूपये २५०००/- इतक्या रकमेच्या चलनाची प्रत, शाळेच्या प्रस्तावित ठिकाणचा संस्थेच्या मालकीचा ५ आर एवढया जमीनीबाबतचा ७/१२ चा अद्ययावत उतारा/प्रापर्टी कार्ड/खरेदीखत किंवा जागा भाडेकराराने (लीज) असल्यास ३० वर्ष कालावधीच्या नोंदणीकृत भाडेकराराची प्रत, रूपये १५ लक्ष इतक्या रकमेची तीन वर्ष मुदतीची मुदतठेव पावती संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांच्याकडे तीन महिन्याच्या आत सादर करणे आवश्यक आहे. या बाबीची पुतता न केल्यास सदर शाळेचे मान्यता आदेश आपोआपच रद्द समजण्यात येईल. **शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद पुणे यांनी सदर शाळेस प्रथम मान्यता देताना उपरोक्त अटीची पुर्तता झाली किंवा नाही याबाबत विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालयाकडून खात्री करूनच प्रथम मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात यावी.**

२. सदर शाळेनी बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेलें व केले जाणारे सर्व नियमांची/ तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

३. पात्र ठरलेल्या संबधित शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे.

४. ज्या व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता आहे अशा व्यवस्थापनांनी शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासुन एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबधित जिल्हयांच्या शिक्षणाधिका-यांकडे अर्ज करावेत

५. ज्या व्यवस्थापनास सन २०१९-२० करिता या शासन निर्णयाव्दारे पात्र ठरविण्यात आले आहे. अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पुर्तता करण्यासाठी या शासना निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्दबातल ठरेल

६. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/ दर्जावाढ शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे,कार्यपध्दतीचे तसेच महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन )मुख्य अधिनियम २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

७. संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतंची पुढील कार्यवाही करावी.

८. संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही, शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रदद समजण्यात येईल.

९. यु-डायस डाटा- या शासन निर्णयाव्दारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/ दर्जावाढ शाळाबाबत जिल्हानिहाय U-DISE (Unified District Infofmation System For Education) मध्ये माहिती भरताना, **स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा** म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशव्दारावर लावणे आवश्यक राहील.

१०. परवानगी दिलेल्या स्वयंअर्थसहाय्यित शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची भरती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करावी.

MRaut

(मिनाक्षी राऊत)

प्र.शिक्षण उपसंचालक

पुणे विभाग पुणे-१

प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी,

१. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे /अहमदनगर /सोलापूर.

प्रत माहितीसाठी सविनय सादर

१. मा. अवर सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२

२. मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे.